ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55027

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष २६ | पुणे, बुधवार, २० मे, १९७० | अंक १०



## "बी प्लेक्स" विरुध्द "ली प्लेक्स"

### अँग्लो फ्रेंच ड्रग कं. वि. आयसेन फार्मा कं. दाव्याचा निकाल

मे. अँग्लो फ्रेंच ड्रग कं. (ईस्टर्न) लि. मुंबई ही औषधे तयार करणारी मोठी कंपनी आहे. ट्रेडमार्कच्या कायद्याखाली सदर कंपनीने (BEPLEX) हा शब्द स्वतःचा ट्रेडमार्क म्हणून नोंदविला आहे. १९४३ सालापासून सदर कंपनी औषधांची निर्मिती व विक्री मोठ्या प्रमाणावर करीत आहे. बीप्लेक्स ह्या नावाने व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स (Vit B-Complex) इंजेक्शन्स, गोळ्या व द्रव औषध या स्वरूपांत विकते. आयसेन फार्मा कं. (प्रा.) लि. पुणे ४ ही कंपनी औषधी कारखानदार असून व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स (Vit. B-Complex) हे द्रव औषध 'लीप्लेक्स' (LEEPLEX) ह्या नावाने विक्री करीत आहे.

अँग्लो फ्रेंच ड्रग कंपनीचे म्हणण्याप्रमाणे ही दोन नावे एवढी सारखी आहेत की, त्यामुळे औषधे विकत घेणाऱ्या ग्राहकांची फसवणूक व गोंधळ होण्याची शक्यता आहे. "लीप्लेक्स" हा शब्द म्हणजे "बीप्लेक्स" या शब्दाची नक्कल आहे व अशा तऱ्हेने साम्य असलेले नाव वापरून आपला माल हा अँग्लो फ्रेंच कंपनीचा माल आहे असे भासविण्याचा व खपविण्याचा पुण्याच्या कंपनीचा हेतु व प्रयत्न आहे. अशा तऱ्हेने नाव वापरल्याने पुण्याच्या कंपनीने अँग्लो फ्रेंच कंपनीच्या रजिस्टर्ड ट्रेड मार्कचा भंग केला आहे म्हणून पुण्याच्या कंपनीला असे नाव वापरण्याविरुद्ध मनाई मिळणेसाठी व त्यांचेकडून रु. १०,००० नुकसानी मिळणेसाठी अँग्लो फ्रेंच कंपनीने आयसेन फार्मा कं. यांचेविरुद्ध पुणे येथील डिस्ट्रीक्ट कोर्टात दावा लावला.

या दाव्यात अँग्लो फ्रेंच कंपनीतर्फे त्यांचे सेक्रेटरी यांची साक्ष घेणेत आली व आयसेन फार्मा कंपनीतर्फे कंपनीचे डायरेक्टर श्री. मा. का. जोशी व पुण्याचे ख्यातनाम डॉक्टर एच. व्ही. सरदेसाई यांची साक्ष घेण्यात आली.

सदरचा दावा पुण्याचे असिस्टंट जज्ज श्री. सी. डी. सावंत यांचेपुढे चालला. त्याचा निकाल २४-३-७० रोजी देऊन त्यांनी अँग्लो फ्रेंच कंपनीचा दावा खर्चासुद्धा फेटाळून लावला व या कामी आयसेन फर्मास्युटिकल्स यांचे विरुद्ध दावा चालू असलेल्या मुदतीत दिलेली तूर्तातूर्त मनाई उठविली.

आपल्या विस्तृत निकालपत्रात श्री. सावंत यांनी दोन्ही बाटल्यांचा आकार, त्यातील औषधांचे प्रमाण, रंग, लेबल, पॅकिंग, बूच, किंमत व त्यातील घटकद्रव्ये यांतील फरक विशद करून या फरकामुळे गिऱ्हाइकांची फसवणूक होण्याची शक्यता नाही असे मत व्यक्त केले आहे.

डॉ. सरदेसाई यांनी आपल्या साक्षीत आणखी एक महत्त्वाचा फरक निदर्शनास आणला होता, तो म्हणजे दोन्ही उत्पादने जरी व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स या नावाने ओळखली जात असली तरी आयसेन फार्मा कं. यांच्या 'लीप्लेक्स' मध्ये अशी दोन घटकद्रव्ये आहेत की जी अँग्लो फ्रेंच कंपनीच्या 'बीप्लेक्स' मध्ये नाहीत. त्यामुळे अँग्लो फ्रेंच कंपनीचे उत्पादन हे व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्सची सर्वसाधारण कमतरता असेल त्या ठिकाणी वापरता येईल, तर आयसेन फार्मास्युटिकल्सचे औषध LEEPLEX हे व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्सच्या कमतरते बरोबरच लिव्हरची तक्रार आहे अशा ठिकाणीही वापरता येते. कोणतेही व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स हे शक्तीसाठी टॉनिक म्हणून घ्यावयाचे सर्वसाधारण औषध नव्हे, तर प्रत्येक रोग्याची प्रकृती पाहून त्याच्या त्याच्या गरजेप्रमाणे कोणते औषध घ्यावयाचे हे डॉक्टरने ठरवून प्रिस्क्रीप्शनप्रमाणे घ्यावे लागते. डॉ. सरदेसाई यांच्या मते 'लीप्लेक्स' व 'बीप्लेक्स' या दोन्ही नावांमुळे घोटाळा अगर फसवणूक होण्याची शक्यता नाही.

---

### करांची थकबाकी फुगत चालली

लोकसभेच्या सार्वजनिक हिशेब समितीने आपला ११७ वा अहवाल लोकसभेला सादर केला आहे. अहवालात करांची थकबाकी वाढत चालल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली असून ह्याबाबत आकडेवार माहितीही देण्यात आली आहे. संपत्ती कराबाबत समितीने असे निदर्शनास आणले आहे की १९६३-६४ सालापासून ह्या करापासून मिळणारे उत्पन्न १० कोटीच्या जवळपास थबकले आहे. ह्याच अवधीत संपत्ती करास प्राप्त असलेल्यांची संख्या मात्र वाढली आहे. १९६४-६५ सालात त्यांची संख्या ६७,०५७ इतकी होती, ती १९६८-६९ सालात १,०५,९३४ इतकी झाली आहे. ह्यावरून समितीने असा निष्कर्ष काढला आहे की ह्या कराच्या वसुलीत सुधारणा करण्यास पुष्कळच वाव आहे. त्याचप्रमाणे प्राप्तीवरील कराच्या वाढत्या थकबाकीबद्दलही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. ३१ मार्च, १९६४ अखेर प्राप्तीकराची थकबाकी १९१.४१ कोटी रुपये होती ती ३१ मार्च, १९६९ अखेर ४३५.४९ कोटी रुपयापर्यंत वाढलेली आहे. प्राप्तीवरील कराच्या आकारणीबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे करण्यात येणाऱ्या अपीलातही वाढ झालेली आहे. अपील प्रकरणांची संख्या ९० टक्क्यांनी वाढलेली आहे. अपील चालविणाऱ्या असिस्टंट कमिशनरापुढे येणाऱ्या प्रकरणी निर्णय लागण्यासही फार विलंब लागतो असे आढळून आले आहे. १९६९ च्या जून अखेर अशी ८,००० अपिले त्यांच्यासमोर रेंगाळत होती. ती सर्व ३ वर्षापूर्वी दाखल झालेली होती.

---

☆ अर्थ ☆

बुधवार, २० मे, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । कौटिलीय अर्थशास्त्र

## शहरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यात धोका

इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ ह्या संघटनेचे पदाधिकारी डॉ. आशिश बोस ह्यांनी हिंदमधील मोठ्या शहरांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्यात असलेल्या धोक्याकडे लक्ष वेधले आहे. दिल्ली येथील रोटरी क्लबात बोलताना ते म्हणाले की येत्या १० वर्षांत भारतामधील मोठ्या शहरांतील समस्या अक्राळविक्राळ स्वरूप धारण करणार आहेत. ह्या बाबतीत अमेरिकेच्या अनुभवावरून बरेच काही शिकण्यासारखे आहे. शहरांची वाढ व नियोजन ह्यांना अमेरिकेने द्यावे तसे महत्त्व दिले नाही. गेली कित्येक वर्षे अमेरिकेने अवकाश संशोधन आणि गणकयंत्रे ह्यावरच आपले लक्ष केंद्रित केले; आणि आता त्या देशापुढे शहरांच्या समस्या एकदम उभ्या ठाकल्या आहेत. तेथील अनेक शहरांतून वंशभेदावरील हिंसाचार उफाळत आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठांच्या परिसरात विद्यार्थी दंगल माजवू लागले आहेत. भारतातही शहरांकडे पुरेसे लक्ष देण्यात येत नाही. शहरांतील समस्या ह्या लोकसंख्येच्या केंद्रीकरणामुळे उत्पन्न झालेल्या आहेत. भारतामधील शहरांत राहणाऱ्या लोकांची संख्या ११ कोटींच्या घरात आहे. पण देशाच्या विस्तारापैकी १८ टक्के भागच शहरांत सामावलेला आहे. जगात १० कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या असणारे देश थोडे आहेत. त्या दृष्टीने विचार केला तर भारतामधील शहरांची लोकसंख्या जपान, पाकिस्तान आणि इंडोनेशिआ ह्या देशांच्या लोकसंख्ये-इतकी आहे. तेव्हा भारतामधील शहरांच्या विकासाच्या योजना ह्या देशांच्या राष्ट्रीय योजना इतक्या मोठ्या असावयास पाहिजेत. पण वस्तुस्थिती मात्र उलट आहे.

भारतामधील मोठ्या शहरांच्या अडचणी अनेक कारणांमुळे उत्पन्न झालेल्या आहेत. एक तर स्थानिक स्वराज्य संस्थांजवळ पुरेसा पैसा नसतो. ह्या संस्थांतील पुढारीही निकृष्ट तोलाचे असतात आणि त्यातून भ्रष्टाचाराची परिसीमाही झालेली असते. शहरांपुढे उभे राहिलेले अरिष्ट आणखीच गडद होत चाललेले आहे. कालबाह्य विचारसरणी, कालबाह्य कायदे व नियम आणि शहरांच्या समस्यांचे संपूर्ण आकलन करण्याची नसलेली कुवत ह्यांमुळे परिस्थिती अधिक बिकट होत आहे. भारतामधील बहुतेक म्युनिसिपल कायदे ह्या शतकाच्या प्रारंभीच्या दशकांत मंजूर झालेले आहेत. शहरांच्या समस्या गंभीर होत चालल्याची लक्षणे आजच दिसत आहेत. अधिकारा-वर असलेल्या कॉंग्रेस पक्षाने भारतामधील दिल्ली, कलकत्ता, मद्रास व मुंबई ह्या शहरांवरील आपली पकड गमावली आहे. ह्या व इतर मोठ्या शहरांतून वाढते तंग वातावरण आढळते. विद्यार्थी व इतर लोक हिंसाचाराकडे वळू लागले आहेत. बेकारी, भाषिक व प्रांतिक वाद आणि शहरांत राहणाऱ्या अनेकविध लोकांत एकात्मतेच्या भावनेचा असणारा अभाव ह्यामुळे हिंसाचाराला वाव मिळत आहे. कलकत्ता हे शहर हिंसाचाराच्या तावडीत आहे. तेथे जे घडते त्याचा परिणाम देशातील इतर भागांवरही होतो. पण, दिल्लीतल्या अधिपतींना वाटते की कलकत्त्यात काय घडते त्याची जबाबदारी पश्चिम बंगालची आहे; त्याच्याशी मध्यवर्ती सरकारचा संबंध नाही. खरी परिस्थिती अशी आहे की शहरांच्या विकासासंबंधी कोणत्याही प्रकारचे दूरगामी धोरण मध्यवर्ती सरकारने आखलेले नाही. त्यामुळे त्यांच्या तातडीच्या प्रश्नांकडेसुद्धा लक्ष देण्याचे त्यांच्या मनातच येत नाही.

---

## विगरतिकीट प्रवाशांची संख्या घटली

फुकट्या प्रवाशांना पकडण्याची मोहीम १९६९ च्या जून महिन्यापासून उघडण्यात आली होती. ह्या मोहिमेचा परिणाम दिसून येऊ लागला असून विनातिकीट प्रवास करणारांच्या संख्येत बरीच घट झालेली आहे. मोहीम सुरू झाल्यापासून आठ महिन्यांच्या काळात रेल्वेच्या तिकिटांच्या विक्रीत १२ कोटी रुपयांची वाढ झालेली आहे मोहिमेतील एक उपाययोजना म्हणून फुकट्या प्रवाशांपासून जबर दंड घेण्याची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे ह्या अवधीत विनातिकीट प्रवास करणारांच्या धरपकडीत जवळजवळ ७२ टक्के घट झालेली दिसून आली. फक्त १८ लाख विगरतिकीट प्रवाशांना ह्या बाबतीत पकडण्यात आले. त्या मागील साली ह्याच अवधीत ६६ लाख प्रकरणे उघडकीस आली होती. विनातिकीट प्रवास कमी करण्यासाठी जबर दंडाबरोबरच इतरही उपाय योजण्यात आले होते. ग्रामीण भागात प्रतिष्ठित ग्रामस्थांची मदत घेण्यात आली. त्याचप्रमाणे स्काऊटस, विद्यार्थी आणि सामाजिक कार्य करणाऱ्या संस्था ह्यांची मदत घेऊन फुकटे प्रवासी उघडकीस आणण्याचे कसून प्रयत्न करण्यात आले. त्याशिवाय विनातिकीट प्रवासाविरूद्ध शिक्षण देऊन लोकमत तयार करण्याचे कामही हाती घेतले होते.

## अपंगांना जगप्रवास घडविणारी आगळी प्रवाससंस्था

वृद्धांचे आणि अपंगांचे जीवन रुक्ष आणि कंटाळवाणे होते. जीवनातील अनेक आनंददायी अनुभव घेण्यास ते अपात्र झालेले असतात. गाठी भरपूर पैसा असला तरी जवळची माणसे सुद्धा त्यांचा कळत न कळत कंटाळा करू लागतात. अमेरिकेसारख्या समृद्ध देशातही काहीशा सदय स्वरूपात वृद्धांचा व अपंगांचा प्रश्न आहेच. मिसेस हॉफमन नावाच्या एका अमेरिकन महिलेने वृद्धांना व अपंगांना जगप्रवास घडविणारी एक संस्था आठ वर्षांपूर्वी काढून ती यशस्वी रीत्या चालविली आहे. त्यांचा मुलगा जॅक हा प्रवाशांना माहिती देण्याचे काम करतो आणि त्या स्वत: ज्या देशात जावयाचे असेल त्या देशातील लोकांची हरप्रकारची माहिती जमवीत असतात. अलीकडेच ह्या संस्थेतर्फे १५ अपंग भारतामधील ताजमहालला भेट देऊन गेले हे सर्व जण पोलिओने व इतर रोगांनी दिकलांत झालेले होते आणि चाके बसविलेल्या खुर्च्यांवरूनच फिरणारे होते. संस्थेच्या रूपाने त्यांच्या खुर्च्यांना पंखच फुटले असे म्हणावयास हरकत नाही. धडधाकट हौशी प्रवासी ज्या ज्या ठिकाणी जातात त्या त्या ठिकाणी ते जाऊन आलेले आहेत. व्हेनिसमधील शहराच्या कालव्यांतून गोंडोला बोटीतून त्यांनी संचार केला आहे. बँकॉकमधील कालव्यातून फिरण्याची मौज त्यांनी चाखली आहे आणि टोकिओ-ओसाका ह्या जगप्रसिद्ध रेल्वेने प्रवासही केला आहे. अपंगांना प्रवास घडविण्याच्या कार्यातील आपला अनुभव सांगताना त्या म्हणतात, " पहिल्या प्रथम ह्या कामाचा अनुभव नसल्यामुळे खूप चुका झाल्या. एका प्रवासात एक बराच आजारी प्रवासी होता. वास्तविक त्याला बरोबर घ्यावयास नको होते. दर दोन तासांनी चालती बस थांबवून त्याला स्ट्रेचरवर निजवावे लागत होते. हा प्रवास हवाईचा होता. प्रवासाहून परत आल्यावर बिचारा काही महिन्यांनी खपला. पण हवाईचा प्रवास करण्याचे त्याचे स्वप्न साकार झाल्यामुळे तो आनंदात होता.

" पंधरा-वीस अपंगांना घेऊन प्रवास करणे सोपे नाही. ज्या हॉटेलांना पायऱ्या नाहीत अशीच हॉटेल्स निवडावी लागतात. पण तरीही कधीकधी कठीण प्रसंगाला तोंड द्यावे लागते. जर्मनीतील ड्युसेल डॉर्फ शहरी गेल्यावर असे आढळले की ठरविलेल्या हॉटेलला २० पायऱ्या होत्या. पण तेथील मॅनेजरने दोन्ही बाजूला कठडे असलेली एक उतरती घसरण तयार केली. तिच्या साह्याने सर्व अपंगांना एकदम हॉटेलच्या मुख्य दिवाणखान्यातच खुर्च्यांत नेता आले. विशेष म्हणजे आमचा मुक्काम होता तोपर्यंत घसरण कायम ठेवण्यात आली होती. ओसाका ते टोकिओ ह्या गाडीत चढण्याचेही काम बिकट होते. टोकिओ येथे गाडी फक्त तीन मिनिटे उभी राहते. आमच्यासाठी म्हणून वेळ एक मिनिटाने वाढविण्यात आला होता. गाडीत चढण्याचा व उतरण्याचा कार्यक्रम तपशीलवार ठरविण्यात आला होता. त्यामुळे सर्व १५ अपंग एका मिनिटात खुर्च्यांवरून गाडीत चढले आणि उतरण्याच्या ठिकाणी १५ सेकंदांत खाली उतरले. जपानमध्ये भरलेल्या एक्सपो ७० ह्या प्रदर्शनात फिरण्यासाठी त्यांची खास व्यवस्था करण्यात आली होती. इतरांना प्रदर्शन पाहण्यासाठी तासन्तास तिष्ठत बसावे लागते. "

मिसेस हॉफमन आपल्या पुढच्या प्रवासात काही अंधांना घेऊन मॅनिलाला जाण्याचा विचार करीत आहेत. इतकेच काय पण अपंगांना नायगारा धबधब्यावरील वेगवान प्रवाहात प्रवास घडविण्याची त्यांची मनीषा आहे. अपंगांना चंद्रप्रवास घडविण्याची उमेदही त्या बाळगून आहेत.

## विविध माहिती

**युगांडामधील फर्म्सचे ६०% राष्ट्रीयीकरण—** युगांडाच्या सरकारने तेथील ८८ विदेशी फर्म्सचे बव्हंशी राष्ट्रीयीकरण केले आहे. त्यात ५ बँका, ७ तेल कंपन्या, ब्रिटिश मालकीचे मोठाले चहाचे मळे, वनस्पती तेलाचे कारखाने, कापड गिरण्या, वाहतुक कंपन्या, टायर आणि पादत्राणांच्या कंपन्या, इत्यादींचा समावेश आहे. ह्या प्रत्येक फर्मचे ६०% भाग भांडवल सरकार स्वतःकडे घेईल आणि भागधारकांना त्यांची किंमत १५ वर्षांत त्या कंपन्यांच्या होणाऱ्या नफ्यातून परस्पर देईल. ह्या फर्म्समध्ये दोन हिंदी बँका ( बँक ऑफ बरोडा आणि बँक ऑफ इंडिया ) आणि काही साखर कारखाने व उसाचे मळे आहेत.

**इन्कम टॅक्स कराचे उत्पन्न—** इन्कम टॅक्स पासून ७८२ कोटी रु. उत्पन्न १९६९-७० मध्ये झाले; गेल्या वर्षी ते ६६४ कोटी रु. होते. संपत्ती कराचे उत्पन्नही वाढून ११·३५ कोटी रु. चे १५·५० कोटी रु. झाले.

**महाराष्ट्र हौसिंग बोर्डाची थकबाकी—** महाराष्ट्र हौसिंग बोर्डाची मुंबईमधील भाडेकरूंकडे १ जानेवारी, १९७० रोजीची थकबाकी ८५·७४ लक्ष रु. आहे.

**हिंदी फुलांची निर्गत—** भारतातून १९६८-६९ मध्ये ५,००० रु. च्या फुलांची निर्गत झाली होती; १९६९-७० मध्ये ती ३९,००० रु. पेक्षा जास्त किमतीची झाली. एकट्या प. जर्मनीने २९,००० रु. ची फुले घेतली.

**पंजाबखेरीज सर्वत्र गुन्हेगारीत वाढ—** १९६३ ते १९६७ मधील सरासरीच्या मानाने १९६८ मध्ये भारतातील गुन्हेगारी खूप वाढली आहे. १९६७ मध्ये ९,६३,७१६ लोकांना अटक करण्यात आली होती; १९६८ मधील त्यांची संख्या १०,४१,२५७ भरली. पंजाबखेरीज बाकी सर्व राज्यांत गुन्हे वाढले; केरळमध्ये सर्वांत जास्त ( ४३·६% ) वाढ झाली.

**शिक्षणावर दरमाणशी खर्च—** भारतात दरमाणशी शिक्षणावर १७ रु. खर्च होतो; अमेरिकेत १,२०० रु. होतो.

## हिंदुस्थानची माहिती देणारा एक जुना ग्रंथ

हिंदुस्थानात व्यापाराच्या मिषाने आलेल्या ईस्ट इंडिआ कंपनीने हळूहळू पाय पसरून भारतावर अधिराज्य स्थापन केले. कंपनीच्या राजवटीच्या पहिल्या काही वर्षांत तिच्या अधिकाऱ्यांना हिंदमधील समाज, त्याच्या कल्पना अगर महत्त्वाच्या व्यक्ती ह्यांची माहिती अर्थातच फारशी नव्हती. तेव्हा १९ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून ही माहिती देणारी अनेक पुस्तके प्रसिद्ध करण्यात आली. अशा पुस्तकांपैकी एक अप्रकाशित पुस्तक सध्या अमेरिकेतील लायब्ररी ऑफ काँग्रेस, वॉशिंग्टन येथे आहे. पुस्तकातील अंतर्गत पुराव्यावरून ते १८४२ च्या सुमारास लिहिले गेले असावे असे दिसते. ग्रंथकर्त्याचे नाव त्यात आढळत नाही. पण ते एका इंग्रजाने लिहिलेले असावे आणि त्याला तत्कालीन हिंदी समाजाची चांगली माहिती होती असे दिसते. ह्या पुस्तकात हिंदू स्त्रियांच्याविषयी पुढील आशयाचा मजकूर आहे. हिंदू स्त्रिया तरुणपणी नाजुक आणि सौंदर्यसंपन्न असतात. त्यांचा बांधा प्रमाणशीर असतो. त्यांचे अवयव लहान असतात आणि चेहऱ्याची ठेवण नीटस असते. डोळे काळे आणि मलूल दिसतात पण सौंदर्याचा हा बहर लवकर ओसरतो आणि ३० वर्षांच्या होण्यापूर्वीच त्या वयस्कर दिसू लागतात. उष्ण हवामान, लहानपणी होणारी लग्ने आणि मातृत्वाची लवकर होणारी प्राप्ती ह्यांचा हा परिणाम असावा. बहुतेक स्त्रिया ३५ व्या वर्षीच आजीबाई होतात. हिंदू स्त्रिया स्वच्छतेच्या बाबतीत अतिशय दक्ष असतात. ज्या विधवा सती जात नाहीत, त्या ब्रह्मचर्याने जीवन घालवू पाहतात. पतीच्या निधनानंतर त्या दागिने वापरत नाहीत अगर चांगले खातपीतही नाहीत. बहुधा त्या एकभुक्त राहतात.

---

## फ्रेंच स्त्रियांना घरात अधिक अधिकार

फ्रान्सच्या पार्लमेंटने एक बिल मंजूर करून फ्रेंच स्त्रियांना कौटुंबिक बाबतीत अधिक हक्क देण्याचे ठरविले आहे. त्यामुळे कुटुंबात निर्माण होणाऱ्या अनेक प्रश्नांबाबत फ्रेंच स्त्रियांच्या मतांना आता कायदेशीर वजन प्राप्त झाले आहे. पतिपत्नींचे काही कारणावरून बिनसले तर वादग्रस्त प्रश्नांपैकी काहींच्या बाबतीत पतीच्या निर्णयाविरुद्ध कोर्टात अपील करण्याचा हक्क त्यांना मिळाला आहे. बिलात परदेश प्रवासाचा परवाना, मुलांना घालावयाच्या शाळेची निवड, वयात न आलेल्या मुलांना परदेशी प्रवासाची मुभा, इत्यादी बाबतींत कलमे आहेत. ह्यापुढे फ्रेंच पुरुषांना कुटुंबाचे राहण्याचे मुख्य ठिकाण कोठे असावे ह्या बाबतीत आपलाच निर्णय लादता येणार नाही. काडीमोड घेऊन विभक्त झालेल्या पतीचे पत्नीबाबत व मुलांबाबत काय अधिकार आहेत ते बिलात नमूद करण्यात आले आहेत. ह्या बिलाला एकमताने पाठिंबा मिळाला.

---

## प्रवाशांना आकर्षित करण्याचे प्रचारसाहित्य

दिल्ली येथील सार्वजनिक वाचनालयातर्फे प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या भित्तिपत्रकांचे व इतर साहित्याचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. प्रदर्शनात मांडण्यासाठी १६ आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक कंपन्यांनी आपली विविध प्रकारची भित्तिपत्रके पाठविली होती. सुमारे २५ हजार प्रेक्षकांनी प्रदर्शनाला भेट दिली. प्रदर्शनात विमान कंपन्यांनी तयार केलेले १२ चित्रपट प्रेक्षकांना दाखविण्याची सोय केली होती. निरनिराळ्या देशांतील लोकजीवन आणि संस्कृती ह्यांचे प्रदर्शन चित्रपटात घडविले होते. विमान प्रवासाने उत्पन्न होऊ शकणाऱ्या आंतरराष्ट्रीय सामंजस्यावर प्रदर्शनात विशेष भर देण्यात आला होता. भारत सरकारचे हौशी प्रवासी खाते आणि एअर इंडिआ अशा प्रकारचे हिंदी चित्रपट मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

---

## जंगलांचा बेलगाम नाश

लोकसभेच्या एस्टिमेटस कमिटीने आपला १०८ वा अहवाल सादर केला आहे. १९६१ पासून ११ लाख हेक्टर जंगल जमीन लागवडीसाठी आणि विकास प्रकल्पासाठी झाडे तोडून तयार करण्यात आली. मध्यवर्ती जंगल बोर्डाने शिफारस केल्याप्रमाणे व पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमात ठरविल्याप्रमाणे ह्या काळात इतकीच जमीन जंगलाखाली आणण्याचे प्रयत्न मात्र करण्यात आले नाहीत ह्याबद्दल कमिटीने चिंता व्यक्त केली आहे. जंगलतोड सध्याप्रमाणेच एकसारखी चालू राहिली तर लवकरच अतिशय गंभीर परिस्थिती निर्माण होईल. विशेषतः ज्या राज्यांत मुळातच जंगले कमी आहेत त्यांना जंगलतोड फार जाणवेल अशी भीती अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

---

## राज्य रस्तावाहतूक मंडळाची १६ वी परिषद

राज्य वाहतूक मंडळाची १६ वी परिषद जयपूर येथे भरली होती. आयुर्विमा कॉर्पोरेशनने ह्या सार्वजनिक मालकीच्या विभागात पुरेसे भांडवल गुंतवावे आणि वाहतूकमंडळाच्या नोकरवर्गाला राहण्यासाठी घरे बांधण्यास पैसा पुरवावा अशी सूचना परिषदेत करण्यात आली. परिषदेला मंडळाचे अध्यक्ष आणि जनरल मॅनेजर्स हजर होते. वाहतूक मंडळाच्या वाहतूक व्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी काही उपायही करण्याचे ठरविण्यात आले. मोठ्या शहरातील बस वाहतुकीच्या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्यात आले पाहिजे. कारण, शहरातील स्थानिक वाहतूक मंडळांना लोकांच्या वाढत्या मागण्या पुरविण्यासाठी व सोयी करण्यासाठी भांडवल गुंतविणे शक्य होत नाही, असा अभिप्राय परिषदेत व्यक्त करण्यात आला.

---

## जगातील सर्वात मोठा लिलाव

जगप्रसिद्ध मेट्रो गोल्डविन मेयर्स ह्या कंपनीने आपल्या स्टुडिओतील अनेकविध कलापूर्ण साहित्याचा नुकताच लिलाव केला. जगातील सर्वात मोठा लिलाव असे त्याचे वर्णन करता येईल. विक्री करावयाच्या मालाची यादीच ४०० पानांची होती. ही यादी प्रत्येकी १० डॉलर्सना विकूनच लिलावाच्या जागी प्रवेश देण्यात आला. स्टुडिओतील साहित्याची किंमत सुमारे २० लाख डॉलर्स असावी असा अंदाज आहे. पण कला विषयाचे तज्ज्ञ आणि वस्तुसंग्रहालयांचे अधिकारी अंदाज करण्यास धजत नाहीत. कारण १९२० सालापासून कंपनीच्या चालकांनी जगभर आपली माणसे धाडून अनेक देशांतून गोळा केलेले सुंदर फिल्मी देखावे व इतर मूल्यवान वस्तू स्टुडिओत आहेत. ह्या लिलावासाठी दररोज सुमारे २,००० लोक हजर राहात असत.

---

## एक्सपो प्रदर्शनात योगासनांचे धडे

ओसाका येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात दिल्लीमधील १८ वर्षांची एक तरुणी योगासनांचे धडे देत आहे. दिल्ली येथील एका आश्रमात तिने ह्यासंबंधीचे शिक्षण पुरे केले आहे. स्वतःचे जास्तीचे वजन कमी करण्यासाठी ती प्रथम आश्रमात दाखल झाली. तिला योगा नामुळे फार फायदा झाला. परिणामी कॉलेजमध्ये नाव घालण्याऐवजी तिने योगाचा प्रसार हेच आपले कार्य ठरविले. ओसाका येथील दूरदर्शन केंद्रावरूनही ती योगासनांचे धडे देत आहे. तिच्या मताने स्त्रियांना सौंदर्य वाढविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी योगिक व्यायाम पद्धतीसारखे दुसरे साधन नाही. अंगकाठी सडसडीत ठेवण्यास तर ह्या साधनाला तोड नाही.

---

## ख्रिस्तावरील चित्रपटाबाबत वादळ

येशू ख्रिस्तावर काढण्यात आलेल्या एका बोलपटाबाबत तामीळनाडूमधील रोमन कॅथॉलिक पंथाचे लोक नाराज झाले असून हा चित्रपट दाखविण्यापूर्वी मध्यवर्ती सरकारने त्यासंबंधी कायदेशीर उपाय करावा असेही सुचविण्यात आले आहे. ह्या चित्रपटात द्रविड मुन्नेत्र कळघमचे श्री. एम्. जी. रामचंद्रन् ह्यांनी ख्रिस्ताची भूमिका केली आहे. ते कसलेले नट असून त्यांनी रॉबिनहुडसारख्या ध्येयप्रेरित दरोडेखोराची व प्रणयी रोमिओची भूमिकाही केलेली आहे. सध्याच्या चित्रपटात काही प्रसंगी येशू मनमोकळेपणे हसल्याची दृश्ये आहेत. धार्मिक प्रवृत्तीच्या रोमन कॅथालिकांना हे आक्षेपार्ह वाटते. श्री. रामचंद्रन् हे तामीळनाडूच्या अधिकारारूढ पक्षाचे एक वरिष्ठ असल्याने ह्या प्रकरणाला काहीसा राजकीय रंग चढला आहे. ते आमदारही आहेत.

---

## स्त्रियांना चित्रपट संगीत अधिक आवडते

ऑल इंडिआ रेडिओने स्त्री श्रोत्यांचे ४,७०० क्लब स्थापन केले आहेत. रेडिओवरील कार्यक्रम त्यांनी अधिक प्रमाणात ऐकावे म्हणून हा उपक्रम करण्यात आला आहे. उपक्रमाला चांगले यश येत असून रेडिओ ऐकणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत चालली आहे. त्यातही चित्रपटातील संगीत ऐकणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. घरकामातील कंटाळवाणेपणा संगीताने कमी होतो असा त्यांचा अनुभव आहे. चित्रपट संगीत ऐकणाऱ्या स्त्रियांकडून रेडिओला सर्वात अधिक पत्रे येतात. विविध भारती ऐकणाऱ्या स्त्रियांकडून गेल्या वर्षी ४ लाख पत्रे आली. विविध भारती हा कार्यक्रम सुरू झाल्याला आता १२ वर्षे झाली आहेत.

---

## पश्चिम जर्मनीत दुसऱ्या महायुद्धाचा २५ वा स्मृतिदिन

पश्चिम जर्मनीचे चॅन्सेलर मि. विली ब्रॅन्डट ह्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरीच्या २५ व्या स्मृतिदिनानिमित्त पार्लमेंटमध्ये भाषण केले. नाझी जर्मनीची शरणागती झाल्यावर पश्चिम जर्मनीच्या लोकसभेत अशा प्रकारचा स्मृतिदिन साजरा होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. चॅन्सेलर ब्रॅन्डट हे युद्ध चालू असताना नाझीविरोधी भूमिगत चळवळीत भाग घेत असत. आपल्या भाषणात ते म्हणाले की हिटलरने सुरू केलेल्या युद्धात कोट्यवधी सैनिक, मुले व स्त्रिया ह्यांची आहुती पडली. त्यांची स्मृती आदरपूर्ण ठेवण्यात आली पाहिजे. युद्धामुळे अनेक देशांच्या लोकांना जे अनन्वित हाल सोसावे लागले त्याचा विसर पडता कामा नये. जर्मन लोकांनी इतिहासाने शिकविलेले धडे विसरू नयेत आणि शांततेचे रक्षण हेच आपल्या राजकीय हालचालींचे लक्ष्य ठेवावे.

---

## आवाज मोठा करा — इंदिराजींचा सल्ला

नव्या कॉंग्रेसच्या पार्लमेंटरी पक्षाची एक सभा दिल्ली येथे भरली होती. त्यावेळी एका सभासदाने अशी तक्रार केली की, ज्या लोकांना मोठ्याने आवाज चढवून बोलता येते त्यांना सभेत बोलण्याची संधी सुलभतेने मिळते. परिणामी ज्या लोकांचा आवाज मामुली आहे पण ज्यांना काही युक्तिवाद करावयाचा आहे ते मागे पडतात. त्यामुळे चर्चेची उपयुक्तताही कमी होते. ह्यावर उपाय म्हणून पंतप्रधान इंदिरा गांधी ह्यांनी असा सल्ला दिला की ज्यांचे आवाज बेताचे आहेत त्यानी नियमीत व्यायाम करून ते चांगले ठणठणीत करावेत म्हणजे सभेत त्यांचा आवाज चांगला ऐकू येईल.

---

**पिक्चर-फोन**—अमेरिकेत पिक्चर-फोनला १ जुलै रोजी प्रारंभ होईल. त्यामुळे फोनवर बोलणारे एकमेकांना प्रत्यक्ष पाहूही शकतील.

## नोकरीसाठी अमेरिकेत जाणाऱ्यांना इशारा

उच्च शिक्षण घेतलेले तंत्रज्ञ व शास्त्रज्ञ भारतामधून बाहेर पडून अमेरिकेत चांगल्या पगाराच्या नोकऱ्या पटकावण्याच्या खटपटीत असतात. अशा लोकांना मॅसेच्युसेटस् येथील एका भारतीयाने सावधानतेचा इशारा दिला आहे. तो म्हणतो की गेल्या वर्षात अमेरिकेतील रोजगारांच्या संधी संकोच पावत आहेत. आणखी दोनतीन वर्षे गेल्याखेरीज ही परिस्थिती सुधारण्याचा संभव नाही. खुद्द अमेरिकेतच अनेक शास्त्रज्ञ व एंजिनिअर्स ह्यांना नोकऱ्या मिळत नाहीत. कारण, बऱ्याच अमेरिकन औद्योगिक संघटनांनी नोकर कमी करण्याचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे उपलब्ध नोकऱ्यांसाठी अमेरिकन उमेदवारच आपापसात जोराची स्पर्धा करीत आहेत. विशेषतः पदार्थविज्ञान, इलेक्ट्रिकल एंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स व मेकॅनिकल एंजिनिअरिंग ह्या शाखा बेकारीच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. भारतामधून नोकरीसाठी आलेल्या लोकांतही बेकारीची लाट पसरलेली आहे. त्यांची संख्या झपाट्याने वाढत असून ह्या बाबतीत भारताने काहीतरी धोरण आखण्याची गरज उत्पन्न झाली आहे. अमेरिकेत आलेले बरेच भारतीय अगदी जरूर तितक्याच शैक्षणिक लायकीचे असतात. शिवाय त्यांचा नोकरीचा अनुभव अमेरिकेतील गरजांशी मिळताजुळता नसतो. त्याशिवाय भारतीय लोकांना भाषेची अडचणही जाणवते. त्यातील कित्येकजण घरच्या ओढीने बेचैन होतात. कित्येकजण एक नोकरी करीत असताच दुसरी शोधत असतात. त्यामुळे अमेरिकन मालकवर्ग भारतीयांना नोकरी देण्यास नाखूष असतो.

## रेल्वेच्या तिकिटविक्रीसाठी गणकयंत्राचा उपयोग

उन्हाळा सुरू झाला की रेल्वे, राज्यवाहतुकीच्या मोटारी, बोटी ह्यांमधून प्रवास करणाऱ्यांची गर्दी उसळते. तिकिटविक्रीच्या खिडक्यांसमोरील रांगा कायमच्याच असल्यासारख्या दिसतात. प्रवाशांना तिकिटे देऊन त्यांची नोंद करण्याचे किचकट काम करता करता तिकिट कारकून टेकीला येतात. हे सर्व काम झटपट व काटेकोरपणाने करण्यासाठी नॉर्दर्न रेल्वेने पुढील उन्हाळ्यापासून कॉम्प्युटरचा–गणकयंत्राचा–उपयोग करण्याचे ठरविले आहे. दिल्ली येथील मुख्य स्टेशनवर अगर रेल्वेच्या मुख्य कचेरीत तो स्थापन करण्यात येईल. दिल्ली येथून लांबचा प्रवास करणाऱ्या रोज २४ गाड्या सुटतात. त्यावर सुमारे ४ हजार झोपण्याच्या व बसण्याच्या जागा असतात. ह्या सर्व जागांच्या विक्रीची क्षणाक्षणाला नोंदणी करण्याचे काम गणकयंत्र चोखपणे बजावील. मुख्य तिकिटविक्रीची कचेरी दिल्लीतील ७ उपकचेऱ्यांना जोडण्यात येईल. दिल्ली शहराची नीट पाहणी करून ह्या उपकचेऱ्यांच्या जागा ठरविण्यात आल्या आहेत. गणकयंत्राच्या साह्याने तेथील कारकून तिकिटांची विक्री करू लागल्यावर प्रवाशांना तिकिटांसाठी तासन् तास ओळीत उभे राहण्याचे दिव्य करावे लागणार नाही. गणकयंत्र जागा शिल्लक आहे की नाही ते पाहण्याचे आणि विक्री झाल्यावर तिकिटांची नोंद करण्याचे काम झटपट उरकेल. दिल्ली येथील ह्या व्यवस्थेचा अनुभव लक्षात घेऊन उत्तर भारतामधील अमृतसर, लखनौ, कानपूर, इत्यादी मोठ्या शहरांतील तिकिटविक्रीची व्यवस्थाही गणकयंत्राच्या साह्याने एकमेकांशी जोडण्यात येईल.

## मध्य-प्रदेशात वन्यप्राण्यांची ६ नवी अभयस्थाने

मध्य-प्रदेशात वन्यपशूंना संरक्षण देणारी १४ अभयस्थाने आहेत. त्यांत आता आणखी ६ ची भर पडणार आहे. ह्याशिवाय राज्यात ३ राष्ट्रीय उद्यानेही आहेत. वन्यपशूंची शिकार आता अधिक खर्चाची आणि अधिक अवघड करण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले आहे. नव्या धोरणाप्रमाणे प्रत्येक वनविभागात एक तरी भाग असा राखून ठेवण्यात येणार आहे की तेथे शिकारीस मना राहील. राज्यातील वन्य पशूंची हत्या फार मोठ्या प्रमाणावर होत आल्याने काही जातीची जनावरे पूर्णपणे नाहीशी होण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचे संरक्षण करण्यासाठी ह्यापुढे शिकारीचे परवाने जंगल अधिकाऱ्याकडून मिळणार नाहीत. त्यासाठी सचिवालयाकडेच लिहावे लागेल. शिकार करण्याच्या फीची वाढ करण्यात येणार आहे. सध्या एका रानरेड्याच्या शिकारीचा परवाना देण्यासाठी शिकार कंपन्या कधीकधी ७० हजार रुपयेसुद्धा आकारतात. राज्य सरकारला मात्र १ हजार रुपयेच मिळतात. वाघाची शिकार करण्यासाठी परदेशीयांकडून २५ हजार रुपयेसुद्धा घेण्यात येतात. हिंदी शिकाऱ्याला रॉयल्टी म्हणून ५० रुपये द्यावे लागतात तर परदेशीय नागरिकांकडून १,००० रुपये घेतले जातात. कायदेशीर परवाने घेऊन शिकार करणाऱ्यांकडून होणाऱ्या जनावरांच्या हत्येबरोबरच बेकायदेशीर शिकारीही हत्या करीत असतात. ह्या अनियंत्रित हत्येचा परिणाम आता दिसून येऊ लागला आहे. शिवपुरी येथील राष्ट्रीय उद्यानात पूर्वी बरेच आढळणारे वाघ व इतर वन्यपशू आता दुर्मिळ होत चालले आहेत.

## मद्यमहोत्सवात हिंदच्या बीरला स्थान

अमेरिकेत भरविण्यात आलेल्या जागतिक मद्यमहोत्सवात हिंदमध्ये तयार करण्यात आलेल्या बीर दारूला स्थान देण्यात आले आहे. हिंदमधील मद्याला आंतरराष्ट्रीय मद्यमहोत्सवात स्थान मिळण्याची ही पहिलीच वेळ आहे. उत्तर प्रदेशात नबाबगंज ह्या ठिकाणी बीर गाळण्याचा एक कारखाना अलीकडे स्थापन करण्यात आला आहे ह्या कारखान्यात तयार झालेल्या बीरमद्याचा दर्जा अमेरिकन तज्ज्ञांच्या पसंतीस उतरला व त्यांनी ह्या मद्याची शिफारस केली. मद्य तयार करण्याची सर्व पद्धत भारतातच शोधून काढण्यात आली आहे. परदेशीय तज्ज्ञांचे साह्य मुळीच घेण्यात आलेले नाही. अशाच प्रकारचा आणखी एक मद्याचा कारखाना आंध्र प्रदेशातील रामचंद्रपुरम् ह्या ठिकाणी उभारण्यात येत आहे.

## भारतातील कराचा बोजा सर्व जगात मोठा

भारतातील व्यक्तींवरील आणि कंपन्यावरील कराचा बोजा सर्व जगात मोठा आहे. भारतातील एकूण लोकसंख्येपैकी फक्त ०.५% लोकांना हा सर्व बोजा सहन करावा लागतो आणि ०.२% लोकांवर एकूण करापैकी ८०% कराचा बोजा पडतो. ५४ कोटी लोकांपैकी फक्त २८ लक्ष लोक गेल्या वर्षी इन्कमटॅक्स देणारे होते; १९७०–७१ च्या अंदाजपत्रकातील सवलतीमुळे त्यांची संख्या आता ३ लक्षांवर उतरेल. ह्याउलट, अमेरिकेतील ३१%, ग्रेटब्रिटनमधील ३९%, ऑस्ट्रेलियातील ४१% आणि जपानमधील २१% लोक करदाते आहेत.

वैयक्तिक उत्पन्नावरील कराचा कमाल दर भारतात (२.५० लक्ष रु. वरील उत्पन्नावर) ८२.५% आहे; तो आता (२ लक्ष रु. वरील उत्पन्नावर) ९३.५% वर जाईल. अमेरिकेतील आणि फ्रान्समधील कमाल दर ७०%, जपानमध्ये ७५%, कॅनडात ८०% आणि ग्रेटब्रिटनमध्ये ९१.२५% आहे. हे दर अनुक्रमे अमेरिकेत १५.१७ लक्ष रु. वरील उत्पन्नास, कॅनडात ३२.७१ लक्ष रु. वरील उत्पन्नास, जपानमध्ये १२.६८ लक्ष रु. वरील उत्पन्नास आणि ग्रेटब्रिटनमध्ये २.७१ लक्ष रु. वरील उत्पन्नास लागू आहेत.

भारतातील कंपन्यांवरील कराचा कमाल दर ५५% आहे. सरटॅक्समुळे तो ७०% पर्यंत जातो. ग्रेटब्रिटनमधील कंपन्यांवरील कराचा कमाल दर ४२.५%, अमेरिकेत ४८%, कॅनडात आणि फ्रान्समध्ये ५०% आणि जपानमध्ये ३५% आहे.

## उद्बोधक उद्गार

"बचतीला निरुत्साह केल्याने सुबत्ता निर्माण होत नाही. सबलांचे बल कमी करून दुर्बलांचे बल वाढत नाही. श्रीमंतांना नष्ट केल्याने गरिबांना मदत होत नाही. कर्जाऊ रकमेवर शहाजोग तारण उभारता येत नाही. मिळकतीपेक्षा जास्त खर्च केल्याने अडचणीतून बाहेर पडता येत नाही. मनुष्याची क्रियाशीलता आणि स्वातंत्र्य नष्ट केल्याने चारित्र्याचा आणि धारिष्ट्याचा पायाच नाहीसा होतो. माणसे जे स्वतः करू शकतील, ते त्यांच्यासाठी इतरांनी करून दिल्याने त्यांना कायमची मदत होऊ शकत नाही." — अब्राहम लिंकन

## श्री महालक्ष्मी को. बँकेतील निरोप व स्वागत समारंभ

"आपण सर्वांनी दिलेल्या सहकार्यामुळेच माझी कोल्हापुरातील कारकीर्द यशस्वी झाली. या कारकीर्दीत आपले सर्व प्रश्न कायद्याच्या कक्षेत बसवून आणि विशेषतः सामान्य माणसांच्या हिताच्या दृष्टीनेच सोडवण्याचा मी प्रयत्न केला. कोल्हापुरातील नागरी सहकारी बँकांची एक असोसिएशन लवकरच स्थापन होत आहे ही चांगली गोष्ट आहे." असे उद्गार कोल्हापूर जिल्ह्याचे माजी उपनिबंधक, सहकारी खाते श्री. ए. डी. शिवदेव ह्यांनी निरोप समारंभ प्रसंगी काढले.

कोल्हापूर जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या वतीने श्री. ए. डी. शिवदेव ह्यांना निरोप व नूतन उपनिबंधक, श्री. दि. ना. मंडलेकर ह्यांचे स्वागत, असा दुहेरी समारंभ श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सभागृहात मोठ्या थाटाने साजरा झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी श्री महालक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष, श्री. द. रा. उमराणीकर हे होते. त्यांच्या प्रास्ताविकानंतर जिल्ह्यातील निरनिराळ्या बँकांच्या वतीने सत्कारमूर्तींना पुष्पहार अर्पण करण्यात आले. श्री. द. न. कणेरकर व श्री. वाय. पी. पोवार ह्यांनी सत्कारमूर्तींच्या गौरवपर केलेल्या भाषणानंतर नूतन तरुण होतकरू उपनिबंधक श्री. मंडलेकर ह्यांनी सहकारी क्षेत्र हाच आपला प्रपंच मानून कोल्हापूर जिल्ह्याच्या सहकारी क्षेत्रातील विकासासाठी जरूर ते प्रयत्न करीन असे आश्वासन दिले. शेवटी महाराष्ट्र बँक्स असोसिएशनचे सदस्य श्री. जनार्दनपंत भोसले ह्यांनी आभार प्रदर्शित केले व हा कार्यक्रम संपला.

**गिर्यारोहकांना सवलतीने जमीन**— १९६५ मध्ये गौरीशंकर शिखरावर आरोहण करणाऱ्या तुकडीतील ९ पंजाबी गिर्यारोहकांना ५०० चौरस वार जागा घरे बांधण्यासाठी देण्यात आली आहे. त्यांपैकी ८ जण जागेच्या सवलतीच्या दराच्या किंमतीतील ४ हजार रुपये देणार आहेत. एक जण १९६५च्या भारत–पाकिस्तान युद्धात जायबंदी झालेला आहे. त्याला जमीन मोफत देण्यात येणार आहे.

**जवाहर–ज्योतीच्या खर्चात काटकसर**— 'तीन मूर्ती' ह्या पं. जवाहरलाल नेहरूंच्या निवासस्थानी 'जवाहर-ज्योत' सतत तेवत ठेवलेली असते. सध्या मोहरीचे आणि कपाशीचे तेल आणि कापूर ह्यावर ती जळते; त्याऐवजी कायम गॅसवर ती जळत ठेवण्याची योजना आहे. त्यामुळे दरमहा ९०० रु. ची खर्चात बचत होईल.

**स्वैपाकाचा गॅस स्वस्त होणार**— स्वैपाकासाठी वापरण्यात येणाऱ्या गॅसची किंमत प्रत्येक सिलेंडरला ४ रु. एवढ्या रकमेने कमी करण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. १ जूनपासून ही कपात अमलात येईल आणि तिचा फायदा गॅस वापरणाऱ्या २ लक्ष कुटुंबांना मिळेल.

**टेनिस सामन्यांची तिकिट विक्री**— बंगलोर येथे पूर्व विभागाचे टेनिसचे अंतिम सामने (डेव्हिस कपसाठी) ऑस्ट्रेलिया आणि भारत ह्यांचेमध्ये नुकतेच झाले, त्या वेळी प्रवेशासाठी १.७५ लक्ष रुपयांची तिकिट विक्री झाली.

**नोटा छापण्यासाठी नवा छापखाना**— देवास येथे चलनी नोटा छापण्यासाठी सुरू करण्यात येणाऱ्या छापखान्यात एका वर्षात, कामाच्या एका पाळीत, १०० कोटी नोटा छापता येतील. पुढे २०० कोटी नोटा छापता येण्याची व्यवस्था आहे. १९७२ अखेर हा छापखाना नोटा पुरवू लागेल. छापखान्याच्या उभारणीस १२.५ कोटी रु. खर्च येईल.

### क्रिकेटच्या बॅटींचा सरकारी कारखाना काश्मीरमध्ये निघण्याचा शक्यता

क्रिकेटच्या बॅटींचे उत्पादन करण्यासाठी काश्मीरमध्ये सरकारी मालकीचा एक कारखाना काढण्याचा विचार चालू आहे. काश्मीरमध्ये विलो लाकडाची विपुलता असून ते सध्या जळणासाठी वापरले जाते. निर्यातीसाठी क्रिकेट बॅटींच्या उत्पादनासाठी स्पोर्टस् गुडस् एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिलने काश्मीर सरकारकडे विलो लाकडाची मागणी केली. हे लाकूड खाजगी कारखानदारांना देऊन त्यांच्याकडून बॅटी तयार करून घ्यावयाच्या आणि त्यापैकी काही प्रमाणात बॅटी स्टेट ट्रेडिंग कार्पोरेशन मार्फत निर्गत करावयाच्या, अशी कौन्सिलची योजना होती. काश्मीर सरकारने २०,००० विलो फळ्या दरसाल देण्याचे मान्य केले असून त्यांचा उपयोग निर्गतीसाठीच व्हावा अशी अट घातली आहे. कौन्सिलने आणखी विलोची मागणी केली आहे. भारतात दरसाल एक लक्ष क्रिकेट बॅटींचे उत्पादन होते. विलो लाकूड जळणासाठी वापरण्यास बंदी घालणे काश्मीर सरकारला शक्य होणार नाही. त्याचे जंगलखाते दरसाल ५०,००० मण विलो लाकूड सरपणासाठी पुरविते. परंतु, बॅटींच्या निर्गतीची शक्यता लक्षात घेता, आपल्या राज्यातच बॅटींचा सरकारी कारखाना काढला जावा, असे त्या सरकारला वाटत आहे; त्या दृष्टीने त्याने केंद्र सरकारला विनंती केली आहे.

---

### निग्रो लोक पोहण्यात पटाईत का नाहीत ?

निग्रो लोक जलतरणात पटू नसतात, असे अमेरिकेतील संशोधनात आढळून आले आहे. स्नायूंची स्निग्धता आणि चरबीचे शरीरातील स्थान ह्यातील फरकामुळे असे होत असावे, असा अंदाज आहे. पोहण्याच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांत निग्रोंना अग्रस्थान नाही, हे त्यामुळेच.

---

### दि कॉसमॉस को ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि. पुणे ३०

या बँकेच्या पर्वती दर्शन शाखेचा ( ४८०-अ-२ पर्वती पुणे ९, ) उद्घाटन समारंभ शनिवार, दिनांक ३०-५-७०रोजी सायंकाळी ठीक ६ वाजता म. म. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांच्या अध्यक्षतेखाली केसरीचे संपादक आमदार जयंतराव टिळक यांच्या हस्ते होणार आहे.

---

### बीड जि. मध्यवर्ती सहकारी बँक लि.

वरील बँकेच्या शिराळ, ता. अष्टी, येथील ( ३१ व्या ) शाखेचे उद्घाटन श्री. श्रीपतराव कदम, अॅडव्होकेट, ह्यांच्या अध्यक्षतेखाली श्री. साहेबराव थोरवे, सभापती, पंचायत समिती, अष्टी, ह्यांच्या शुभ हस्ते दि. १५ मे रोजी सकाळी १० वाजता झाले.

### औषधांच्या किंमतीत कपात : जाहिरातींवर परिणाम

औषधांच्या किंमतीमधील कपातीमुळे मुंबईमधील कित्येक औषध कंपन्यांनी वृत्तपत्रांतील, जाहिराती बंद केल्या आहेत. रेडिओवरील आणि चित्रपटगृहातील जाहिरातीही त्यांचे करार संपताच बंद केल्या जातील. औषध कंपन्यांचा जाहिरातीवरील वार्षिक खर्च ९ कोटी रु. आहे. जाहिरात कंपन्यांच्या धंद्यापैकी २५% धंदा औषध कंपन्यांकडून मिळतो. त्यामुळे जाहिरात कंपन्यांतील नोकर कमी करावे लागतील. छापखान्यांच्या धंद्यावरही परिणाम होईल. औषध कंपन्यांना आपले प्रचारक कमी करावे लागतील. औषध कंपन्या डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन-शिवाय घेण्याच्या औषधांची व टॉनिकचीच मुख्यतः जाहिरात करीत असतात.

---

### सहकारी संघटनेचा पुनर्विचार—साधना ट्रस्टतर्फे परिसंवाद

महाराष्ट्र राज्य सरकारचे सहकारमंत्री माननीय यशवंतराव मोहिते ह्यांनी सहकारी चळवळीच्या पुनर्रचनेसंबंधी विधिमंडळात जे निवेदन केले व पुस्तिका प्रसिद्ध केली, त्यावर साधना ट्रस्टने एक परिसंवाद दि. ३० व ३१ मे, १९७० रोजी गोखले इन्स्टिटयूटच्या रावबहादूर काळे सभागृहात आयोजित केला आहे. परिसंवादातील निर्णयांचा सारांश सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. परिसंवादाचे निमंत्रण श्री. य. द. सोले आणि श्री. ह. म. गद्रे ह्यांच्या सहीने काढण्यात आले आहे.

---

**मुंबईत दारूचे ५५,२२५ परवानदार**—सबंध महाराष्ट्रात ८०,९२० लोकांनी दारू पिण्याचे परवाने घेतलेले आहेत. त्यापैकी ५५,२२५ मुंबईतले आहेत. सबंध महाराष्ट्रात दारूची ११८ दुकाने आहेत. त्यापैकी ७९ मुंबईत आहेत. त्याखेरीज २१ परमिट रुम्स आहेत. सबंध महाराष्ट्रात ताडीची १,९०१ दुकाने आहेत. त्यापैकी मुंबईत फक्त २३० आहेत.


**हुंडणावळ निधीचा उच्चांक**—भारताचा परदेशी हुंडणावळीचा निधी आता ७७६ कोटी रु. चा आहे. गेल्या २० वर्षातील तो उच्चांक आहे. निर्यातीत वाढ आणि आयातीत घट, ह्याचा तो परिणाम आहे.


**बहुतेक बँका रोखे घेणार**—भारत सरकारने जुलै, १९६९ मध्ये १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांपैकी बहुतेक सर्वांनी भरपाईदाखल सरकारी रोखेच घेण्याचे ठरविले आहे. बँकिंग कपन्यांच्या इच्छेप्रमाणे भरपाईची रक्कम रोख अथवा रोख्यांच्या स्वरूपात आता दोन महिन्यांत त्यांना दिली जाईल.

**आकाशवाणीचे जाहिरातींपासून उत्पन्न**—आकाशवाणी-वर करण्यात येणाऱ्या जाहिरातींपासून ऑल इंडिया रेडिओला दरमहा सरासरीने १९,२०,३६४ रु. उत्पन्न १९६९-७० मध्ये मिळाले.




® वरील ट्रेडमार्क किर्लोस्कर प्रोप्रायटरी लिमिटेड या कंपनीच्या मालकीचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क असून किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड ही कंपनी त्याचा वापर करणारी अधिकृत कंपनी म्हणून नोंदविलेली आहे.



इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग—सांगली (महाराष्ट्र)

फोन : २३२ तार : Vijayplow

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)